सत्यमेव जयते

# Draft Guidelines

# For

# Establishing Cluster Universities

# In

# Maharashtra

Department of Higher & Technical Education,
Government of Maharashtra

## Table of Contents

**Introduction** 3

**A. Rationale for a Cluster University** 5

**B. Requirements for the formation of a Cluster University** 5

**C. Process of formation of a Cluster University:** 10

**D. Dissolution of the Cluster University** 11

# Draft Guidelines for Establishing Cluster Universities in Maharashtra

## Introduction

The NEP 2020 underscores the need of phasing out the existing affiliation system and promote a culture of innovation, multidisciplinary education, and flexibility to students. The NEP recognizes the potential and benefits of an innovative governance structure in enhancing educational outcomes, promoting interdisciplinary studies, and facilitating collaborations among institutions.

One of the suggestions given by UGC to achieve this purpose in its **“Guidelines for Transforming Higher Education Institutions into Multidisciplinary Institutions”** issued in September 2022 is through clustering of colleges. Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan (RUSA) has also promoted converting existing high-performing institutions into cluster universities.

The Government of Maharashtra has drafted these policy guidelines for the establishment of cluster universities with a vision to foster multidisciplinarity, collaboration, and innovation in the academic landscape. The draft guidelines aim to shed light on the unique concept of cluster university. The guidelines encourage the establishment of cluster universities by pooling resources and strengths of eligible high-performing colleges under eminent trust/ society/Santha in the state. This initiative is set to transform the educational system by bringing together multiple institutions under a single administrative and academic umbrella, aligning with the objectives set forth in the NEP 2020

Maharashtra has emerged as a pioneer by becoming the only state in India to secure approval for the establishment of cluster universities under the aegis of the Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan (RUSA). Today, three cluster universities are functioning in the state (Dr. Homi Bhabha State University, HSNC University, Mumbai, and Karmaveer Bhaurao Patil University, Satara). This reflects the state's commitment to academic administrative and Governance reforms for providing quality education and fostering a holistic learning environment.

Cluster universities, with their unique structure, bring together multiple colleges and institutions within a geographical region to create a vibrant ecosystem of learning. In line with the proposed guidelines, all colleges under the proposed cluster university are expected to merge into a cohesive school system, emphasizing synergy, collaboration, and holistic development. As part of this momentous transformation, the principals of these colleges will be seamlessly integrated into the relevant responsible administrative & academic positions, fostering a unified leadership approach. This strategic move aims to create a powerful network of educational institutions,

pooling together resources, expertise, and innovative ideas to provide students with an unparalleled learning experience.

By leveraging the collective resources, expertise, and infrastructure of participating institutions, cluster universities would offer students a diverse range of multidisciplinary academic programs and learning opportunities. This collaborative approach encourages interdisciplinary research, promotes innovation, and nurtures a culture of holistic development among students. With the implementation of these cluster university guidelines, a new era of educational excellence is on the horizon, promising exciting learning opportunities for students, faculty, and the entire academic community.

Central to this framework is the concept of lead colleges, which will play a pivotal role in steering the progress and success of the cluster universities. The lead college is envisioned as an existing high-performing institution with the necessary infrastructure, expertise, and capabilities to guide and coordinate the activities of the cluster universities. It serves as a lighthouse, guiding other institutions within the cluster toward a shared vision of academic excellence and holistic development. Lead College is integral to the success of the cluster university model, lead college is expected to perform the lead role in providing strategic vision to transform the cluster of colleges seamlessly in the new school system and gives direction for the same, act as facilitators and coordinators, mobilizing resources and capacity building and professional development of staff. By nurturing strong lead colleges, Maharashtra is paving the way for the holistic development of institutions and the realization of their collective potential.

These guidelines serve as a comprehensive resource for management, administrators, educators, and stakeholders interested in establishing and managing cluster universities. The guidelines cover various aspects, including governance structures, academic frameworks and quality, Infrastructure & resources, collaborations with industry and research organizations academic qualification, and eligibility criteria for applying for Cluster University

After a detailed analysis of the guidelines provided by Rashtriya Uchchattar Shiksha Abhiyan (RUSA) 2.0, and incorporating the insights gained from the implementation of three cluster universities in Maharashtra, a set of recommended guidelines has been formulated for the establishment of cluster universities. The draft guidelines for establishing cluster universities in Maharashtra are being placed in public domain for wide stakeholder consultation. The Government of Maharashtra solicits your comments/feedback/suggestions on the same which will enable us to bring out sustainable guidelines. **You are requested to give your valuable**

**feedback/suggestions on the draft guidelines via email ( vishi3-hted@mah.gov.in) or by post to the Principal Secretary, Department of Higher & Technical Education, Government of Maharashtra, Mantralya Annex, 4th Floor, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mumbai-400032 by 30th June 2023**.

## A. Rationale for a Cluster University:

The cluster university as an institutional framework can bring desired transformative reforms in academics, administration, and governance. The cluster universities will also reduce the burden on affiliating universities. These universities can take appropriate measures for promoting innovations in teaching-learning processes and develop interdisciplinary studies. These small universities with their nimble-footed governance can quickly respond to the ever-changing science, technology, and skills landscape.

Creating a favorable environment and establishing an ecosystem is crucial for institutions in the State to collaborate and improve the quality of education. With the rapid growth of educational institutions in Maharashtra, there is a significant opportunity to harness their potential by fostering collaboration and expansion.

Normally a cluster university will be formed by bringing together the Higher Education Institutions (HEIs) under a single management. However, if different managements want to join hands by bringing together their colleges, they can apply for conversion to a cluster university after a feasibility assessment.

## B. Requirements for the formation of a Cluster University

### I. Number of Colleges:

a) To form a cluster university, it is required to pool the resources of a minimum 2 and not more than 5 aided/unaided colleges under a single management, leveraging their academic, physical, and technical facilities.

b) If there is a potential to include more than 5 colleges within the cluster university, the State government may evaluate such applications on a case-to-case basis.

### II. Institutional Requirements

a) **Administrative Presence**:

I. The Lead college must have been in existence for the previous 20 years

b) **Minimum enrolment**:

I. The Lead college must have an enrolment of at least 2000 students (all programs taken together).

II. All the participating colleges (including the lead college) must have an enrolment of at least 4000 students (all programs taken together).

c) **Physical Proximity**: To establish a cluster university, it is essential to ensure a suitable physical proximity among the participating colleges involved. This proximity allows for the sharing of physical and human resources, as well as enables seamless mobility for students and faculty members.

I. Participating colleges should be located within a maximum radius of **25 km** from the Lead college.

II. Exceptions may be considered for distances beyond this radius on a case-by-case basis if dedicated transportation facilities are available.

d) **Land availability and required construction:** All the participating colleges together

I. must have a combined construction area of at least **15000 $m^2$**. Additionally, the criteria mentioned in Government Resolution, dated 15.09.2017 as well as AICTE criteria about building construction and physical facilities, will have to be fulfilled, and

II. **2** hectares of land in Mumbai Metropolitan Region, or the minimum land required for the constructed area and facilities as in (a) above, or

III. **4** hectares of land in metro cities (Nagpur, Aurangabad, Pune, Nashik), or

IV. **6** hectares of land in the remaining areas

**III. Academic Standards:**

a) **NAAC Score:**

I. The Lead college must have a NAAC rating of 3.25 or an equivalent NBA score or 60% of programs accredited by the NBA.

II. All the participating colleges must have a valid NAAC rating and/or a minimum 30% programs with valid NBA accreditation

b) **Research Centre:** At least two functional research centres approved by the affiliating university and as per the prescribed UGC norms.

c) **Research Capacity**: Lead & Participating Colleges should have excellent research performance through publications, undertaking research projects, and mentoring research students

d) **Strong Academic Track Record**: Lead & Participating Colleges should demonstrate high academic performance in interdisciplinary teaching and research programs.

e) **Mobilization of Resources**: The proposed cluster university should be able to demonstrate the capacity to raise/mobilize resources other than available public funding

**IV. Other requirements to be fulfilled**

a) **Digital Infrastructure**: Lead & Participating Colleges should have a robust digital infrastructure for teaching, learning, and administration and up-to-date networking facilities

b) **Offering Courses in local and other Indian Languages**: The proposed cluster university should commit to offering a few courses in Marathi and other Indian Languages, to cater to the regional needs and promote linguistic diversity as suggested under NEP 2020

c) **Industry Collaboration**: The proposed cluster university should submit the current status of partnerships with national and international institutions/industries for research collaboration, as well as provide apprenticeships/internships and embedded degree programs and should submit a roadmap for its upscaling and expansion.

d) **Teaching Programs at the Ph.D. level**: The proposal for the cluster university should include Ph.D. studies and encourage research and innovation.

e) **Centres of Information Technology & Start-up**: The establishment of Centres for Information Technology, Start-Up Centre, Innovation and Incubation Centre, and other relevant domains shall be mandatory for the proposed cluster university

f) **New Credit Framework**: The new academic credit framework of the proposed cluster university should adhere to the directives of the State Government and align with the principles outlined in the National Education Policy 2020.

g) **Compliance to Guidelines of UGC & State Govt**.: The instructions and guidelines issued by the University Grants Commission (UGC) and the State Government regarding the new educational policy should be strictly followed.

h) **Strong Governance Structure**: The proposed cluster university should have a robust internal governance structure in line with the guidelines specified by the regulatory bodies. It should establish relevant statutory bodies like the Board of Management, Academic Council, Board of Studies, Research Council, Finance Committee, and other non-statutory committees

i) **Reservation as per Policy of State Government**: The proposed cluster university should diligently adhere to the applicable reservation policy of the State Government.

j) **Disabled-Friendly Infrastructure**: All buildings of the colleges within the cluster university should be designed to be disabled-friendly, providing appropriate physical facilities to accommodate the needs of individuals with disabilities.

**V. Commitments:** The proposed university should commit to the following requirements and expectations which will be suitably incorporated in the DPR:

a) **Implementing National Education Policy 2020**: The proposed university should commit to implementing the action points outlined in the National Education Policy 2020 with clear timelines.

b) **Sharing of Facilities and Ventures**: All the colleges (Lead & participating) should agree to share existing facilities and undertake joint ventures to promote access, equity, and quality of education.

c) **Academic, Examination, and Governance Reforms**: The university should commit to academic, examination, and governance reforms as per the guidelines.

d) **Principles of Governance**: The proposed university should adhere to principles such as equal status to participating units/schools, collective decision-making, autonomy and accountability, independence and interdependence, a partnership of institutions, and social accountability.

e) **Governance Structure**: The respective institutions should propose an appropriate governance structure for cluster universities, in accordance with the guidelines of the state and central governments.

f) **Infrastructure Enhancement**: The university should plan to convert existing buildings into fully disabled-friendly structures and ensure sufficient space for classrooms, labs, and libraries.

g) **Accommodation for Students**: Adequate hostel facilities or appropriate arrangements should be made for accommodation for both boys and girls, with due preference given to socially and economically weaker sections.

h) **Scholarships to needy students**: The University must commit to supporting needy students with tuition fee waivers and other financial help, as required. The DPR should mention the number of students and the eligibility criteria for availing of the scholarships.

i) **ICT Integration**: The sponsoring body must commit to incorporating Information and Communication Technology (ICT) in teaching, learning, and evaluation processes across all colleges within the cluster. This includes providing internet access, and granting students access to databases and digital content available in the library.

j) **Performance Appraisal System**: A 360-degree feedback and performance appraisal system should be implemented to recognize innovation in teaching and pedagogy and maintain quality and impact**.**

k) **Faculty Excellence**: Based on the performance of the faculty, the excellence of faculty members should be incentivized through appropriate rewards, promotions, recognition, and leadership opportunities.

VI. **Detailed Project Report/Proposal (DPR) for Cluster University:** The Detailed Project Report (DPR) must include, apart from the details of commitments as sought above, the following:

a) **Institute Development Plan:** The proposed Cluster University must prepare a detailed IDP for a five-year period in alignment with the National Education Policy (NEP) 2020

b) The DPR should include elaborate strategies to merge and convert participating colleges into cohesive school system, as other public & private universities, in the state to facilitate flexibility and choice of credit concentrations to the student, offered by the schools of proposed cluster university

c) **UG & PG and Ph.D. Programs:** DPR should include outline of curriculum of innovative multidisciplinary degrees, postgraduate as well as Ph.D. programs. Additionally, the plan should include a few greenfield academic programs with timelines.

d) The proposed university should mention plans in the DPR to suitably redesign/restructure with a multidisciplinary approach and enhance the relevance of the existing degree and post-graduate programs.

e) The proposed cluster university should mention the additional infrastructure, manpower, and other resources requirement after the gap analysis for the future expansion. The DPR should also include five-year financial projections, clearly mentioning the provisions for the mobilization of the financial resources required for the proposed cluster university.

**C. Process of formation of a Cluster University:**

a) **Invitation to Managements**: After the finalization of these guidelines, the Government, through a public notice, shall invite interested managements of colleges/HEIs to apply for conversion into a cluster university.

b) **Detailed Project Report**: The interested management may submit a detailed project report consisting of all the details as required in these guidelines.

c) **Scrutiny of the proposal**: A committee shall be appointed by the GOM to scrutinize the DPRs received. The scrutiny may include physical visits to the participating colleges, as required.

d) **Recommendation and Approval**: The committee may raise queries to get necessary details and clarifications and, thereafter, shall submit its recommendations about individual proposals.

e) **Approval from Cabinet and the Hon'ble Governor:** Eligible proposals shall be processed under the provisions of section 3(6) of the Maharashtra Public Universities Act, 2016.

**D. Dissolution of the Cluster University**

a) The Parent Body may dissolve the University, by giving notice with sufficient reasons to this effect to the University employees, and the students at the University and to the Government at least one year in advance.

b) If it appears to the Government that the existing University has contravened any of the provisions of the Act or the rules, statutes, or ordinances made there under, or has contravened any of the directions issued by it under the Act or the Notification, or has ceased to carry out any of the undertakings, the situation of financial mismanagement or mal-administration has arisen in the proposed University, it may issue a notice requiring the proposed University to show cause within forty-five days as to why an order of its liquidation should not be made.

c) In the case of dissolution, the Government, shall assess and ascertain the outstanding financial liabilities, unsatisfied commitments of financial, non-financial, and academic nature to anybody including teaching and non-teaching employees and students, as well as non-compliance of regulatory bodies, and shall recover the necessary amount from the Parent Body for which the parent body shall stand indemnified, provided that, the Parent Body shall have the right to be represented in the process of such assessment and ascertainment.

d) The dissolution of the University shall have effect only after the last batch of students of the regular courses have completed their courses and have been awarded degrees, diplomas, or awards, as the case may be.

e) After the dissolution, the lead college, and participating colleges of the cluster University may get affiliated to the parent University, with the prior permission of the State Government.

सत्यमेव जयते

# राज्यामध्ये समूह विद्यापीठे स्थापन करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या मसुद्यावर हरकती व सूचना मागविण्याबाबत

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,

महाराष्ट्र शासन

# <u>नोटीस</u>

**राज्यामध्ये समूह विद्यापीठे स्थापन करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांच्या मसुद्यावर हरकती व सूचना मागविण्याबाबत.**

**पार्श्वभूमी-**

नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-2020 शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी, आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमांना चालना देण्यासाठी, शैक्षणिक संस्थांमधील सहयोग सुलभ करण्यासाठी नाविन्यपुर्ण प्रशासन संरचनेची क्षमता व फायदे ओळखून विद्यमान संलग्नता प्रणाली टप्प्या-टप्प्याने काढून नाविन्यपुर्ण बहुविद्याशाखीय शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक लवचिकता प्रदान करण्याची गरज अधोरेखित करते.

विद्यापीठ अनुदान आयोगाने सप्टेबर, 2022 मध्ये निर्गमित केलेल्या उच्च शिक्षण संस्थांचे बहुविद्याशाखीय संस्थांमध्ये रूपांतरित करण्याबाबतच्या मार्गदर्शक तत्वांचे अनुपालन करण्याचा एक मार्ग हा महाविद्यालयांचे समूह तयार करणे आहे.

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA) या अंतर्गतही विद्यमान उच्च-कार्यक्षम शैक्षणिक संस्थांचे समूह विद्यापीठांमध्ये रूपांतर करण्यास प्रोत्साहन दिले आहे. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA) अंतर्गत समूह विद्यापीठांच्या स्थापनेला मान्यता मिळवून देणारे महाराष्ट्र हे भारतातील एकमेव अग्रगण्य राज्य म्हणून उदयास आले आहे. आज राज्यात तीन समूह विद्यापीठे कार्यरत आहेत (डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ,मुंबई, HSNC विद्यापीठ, मुंबई आणि कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा). ही बाब गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी आणि सर्वांगीण शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी शैक्षणिक, प्रशासकीय आणि प्रशासन सुधारणांबाबत राज्याची वचनबद्धता दर्शवते.

शैक्षणिक क्षेत्रामध्ये बहुविद्याशाखीयता, सहयोग आणि नवकल्पना वाढवण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA) 2.0 द्वारे प्रदान केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे तपशीलवार विश्लेषण करुन आणि महाराष्ट्रातील तीन क्लस्टर विद्यापीठांच्या स्थापनेतून मिळालेल्या अनुभवजन्य मुद्दयांचा समावेश करून समूह विद्यापीठांच्या स्थापनेसाठी मार्गदर्शक तत्वांचा मसुदा तयार केला आहे.

या मार्गदर्शक तत्वांचा उद्देश समूह विद्यापीठाच्या नाविन्यपुर्ण संकल्पनेवर प्रकाश टाकणे आहे. राज्यातील प्रख्यात शैक्षणिक संस्थांतर्गत पात्र व उच्च-कार्यक्षम महाविद्यालयांच्या संसाधनांचा आणि क्षमतांचा एकत्रित वापर करून समूह विद्यापीठांच्या स्थापनेला प्रोत्साहन देण्याचा उद्देश या मार्गदर्शक तत्वांचा आहे. नविन शैक्षणिक धोरण- 2020 मधील उद्दिष्टांच्या पुर्ततेच्या अनुषंगाने शैक्षणिक व्यवस्थेत

परिवर्तन घडवून आणण्यासाठी शैक्षणिक संस्थांना एकाच प्रशासकीय आणि शैक्षणिक छत्राखाली एकत्र आणण्याचा हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

या मार्गदर्शक तत्वांनुसार प्रस्तावित समूह विद्यापीठांतर्गत सर्व सहभागी महाविद्यालयांनी समन्वय, सहयोग आणि सर्वांगीण विकासावर भर देऊन एकसंध शिक्षण प्रणालीमध्ये विलीन होणे अभिप्रेत आहे. या महत्त्वपूर्ण परिवर्तनाचा एक भाग म्हणून, एक एकीकृत नेतृत्व दृष्टीकोन वाढण्याच्या अनुषंगाने समूह विद्यापीठांतर्गत सहभागी महाविद्यालयांच्या प्राचार्यांना संबधित जबाबदार प्रशासकीय आणि शैक्षणिक पदामध्ये कायम ठेवले जाणार आहे. या धोरणाचा उद्देश शैक्षणिक संस्थांचे एक शक्तिशाली जाळे तयार करणे, संसाधने, कौशल्ये आणि नाविन्यपूर्ण कल्पना एकत्र करून विद्यार्थ्यांना सर्वसमावेशक शिक्षण उपलब्ध करुन देणे आहे.

या आराखड्याच्या केंद्रस्थानी प्रमूख महाविद्यालयाची संकल्पना आहे, जी समूह विद्यापीठाच्या प्रगती आणि यशामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. प्रमूख महाविद्यालय हे शैक्षणिक दृष्ट्या उच्च कामगिरी करणारे, आवश्यक ती पायाभूत सुविधा, प्रशिक्षित अध्यापक आणि समूह विद्यापीठाच्या क्रियाकलापांचे मार्गदर्शन आणि समन्वय करण्यासाठी सक्षम असणारे महाविद्यालय/ संस्था असेल जे समूह विद्यापीठातील घटक महाविद्यालये/ संस्थांना सामायिक दृष्टीकोनातून शैक्षणिक उत्कृष्टता आणि सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शन करेल, समन्वयक म्हणून काम करेल, आवश्यक संसाधने एकत्रित करुन क्षमता वाढवेल आणि कर्मचा-यांचा व्यावसायिकदृष्टीकोनाचा विकास करेल.

ही मार्गदर्शक तत्वे समूह विद्यापीठे स्थापन- व्यवस्थापित करण्यात स्वारस्य असलेल्या भागधारक, संस्था व्यवस्थापन, प्रशासक आणि शिक्षक यांसाठी एक संधी असून या मार्गदर्शक तत्वांमध्ये प्रशासन संरचना, शैक्षणिक आराखडा आणि गुणवत्ता, पायाभूत सुविधा आणि संसाधने, उद्योग आणि संशोधन संस्थांशी सहकार्य, शैक्षणिक पात्रता आणि समूह विद्यापीठाच्या मान्यतेसाठी अर्ज करण्यासाठी पात्रता निकषांसह विविध मुद्दे समाविष्ट आहेत.

**महाराष्ट्रात समूह विद्यापीठे (cluster Universities) स्थापन करण्यासाठी धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. त्यानुषंगाने तयार करण्यात आलेली खालील मार्गदर्शक तत्वे/ पात्रता निकष शैक्षणिक भागधारकांच्या (stakeholders) विचारार्थ उपलब्ध करुन देण्यात येत असून यावर सर्व भागधारकांच्या प्रतिक्रिया/ सूचना/ हरकती मागविण्यात येत आहेत. ज्याचा विचार करुन समूह विद्यापीठे स्थापन करण्यासाठी सर्व समावेशक मार्गदर्शक तत्वे/ धोरण अंतिम करणे शासनास शक्य होईल. दिनांक ३० जून २०२३ पर्यंत vishi3-hted@mah.gov.in या ई-मेलवर किंवा प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, 4 था मजला, मंत्रालय (विस्तार), हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई या पत्यावर टपालाद्वारे पाठविण्यात याव्यात.**

**अ) समूह विद्यापीठ स्थापन करण्याची कारणमिमांसा :**

संस्थात्मक चौकट म्हणून समूह विद्यापीठ शैक्षणिक, प्रशासन आणि प्रशासनामध्ये इच्छित परिवर्तनात्मक सुधारणा आणू शकते. ही विद्यापीठे अध्यापन-शिक्षण प्रक्रियेतील नवकल्पनांना चालना देण्यासाठी आणि आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी योग्य उपाययोजना करू शकतात. ही छोटी विद्यापीठे त्यांच्या छोट्या जलद प्रशासनासह सतत बदलत असलेल्या विज्ञान, तंत्रज्ञान आणि कौशल्यांच्या वातावरणाला त्वरित प्रतिसाद देऊ शकतात. समूह विद्यापीठांमुळे अस्तित्वातील विद्यापीठांवरील भारही कमी होईल.

शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी आणि सहकार्य करण्यासाठी राज्यातील संस्थांसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे आणि परिसंस्थेची स्थापना करणे महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थांच्या झपाट्याने वाढ होत असताना, सहकार्य आणि विस्तार वाढवून त्यांच्या क्षमतांचा उपयोग करण्याची ही महत्त्वपूर्ण संधी आहे.

सामान्यत: एकाच व्यवस्थापनाखाली उच्च शिक्षण संस्था (HEIs) एकत्र आणून एक समूह विद्यापीठ तयार केले जाईल. तथापि, जर भिन्न व्यवस्थापनांना त्यांची महाविद्यालये एकत्र आणून हातमिळवणी करायची असेल, तर अशा व्यवस्थापनांची व्यवहार्यता तपासणी करुन समूह विद्यापीठात रूपांतर करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

**ब) समूह विद्यापीठाच्या निर्मितीसाठी आवश्यक निकषः-**

**1) महाविद्यालयांची संख्या:**

अ) समूह विद्यापीठ तयार करण्यासाठी, एकाच व्यवस्थापन/ शैक्षणिक संस्थेच्या अधिपत्याखालील किमान 2 व कमाल 5 अनुदानित/ विनाअनुदानित महाविद्यालयांच्या संसाधने, शैक्षणिक, भौतिक आणि तांत्रिक सुविधांचे एकत्रीकरण करणे आवश्यक राहील,

आ) व्यवस्थापन/ शैक्षणिक संस्थेची क्षमता असेल तर 5 पेक्षा जास्त महाविद्यालये/ संस्था समूह विद्यापीठामध्ये समाविष्ट करण्यासाठी राज्य शासन प्रकरणनिहाय विचार करेल.

**2) संस्थात्मक निकष**

अ) प्रशासकीय अनुभव : समूह विद्यापीठातील प्रमूख महाविद्यालय मागील 20 वर्षांपासून अस्तित्वात असले पाहिजे.

आ) किमान विद्यार्थी संख्या: प्रमूख महाविद्यालयात किमान 2000 विद्यार्थी संख्या नोंदणी (सर्व अभ्यासक्रमांचा समावेश करुन) असणे तसेच, सर्व सहभागी महाविद्यालयांमध्ये (प्रमूख महाविद्यालयासह) किमान 4000 विद्यार्थी संख्या (सर्व अभ्यासक्रमांचा समावेश करुन) असणे आवश्यक आहे

इ) भौतिक समीपता : समूह विद्यापीठ स्थापन करण्यासाठी, सहभागी महाविद्यालयांमध्ये योग्य भौतिक निकटता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. ज्यामुळे भौतिक आणि मानवी संसाधनांचे, विद्यार्थी आणि प्राध्यापकांचे सामायिकीकरण करणे सोयीस्कर होईल.

i) सहभागी महाविद्यालये प्रमूख महाविद्यालयापासून जास्तीत जास्त 25 किमी त्रिज्येमध्ये स्थित असावी.

ii) समर्पित वाहतूक सुविधा उपलब्ध असल्यास या त्रिज्येच्या पलीकडे असलेल्या अंतरांसाठी अपवाद म्हणून प्रकरणनिहाय प्रस्ताव विचारात घेतले जाऊ शकतील.

ई) जागेची उपलब्धता आणि आवश्यक बांधकाम: सर्व सहभागी महाविद्यालये एकत्रितपणे बांधकाम व जागा खालीलप्रमाणे असणे आवश्यक

i) किमान 15000 चौमी इतके एकत्रित बांधकाम क्षेत्र असणे आवश्यक आहे या व्यतिरिक्त, दिनांक 15.09.2017 च्या शासन निर्णयात नमूद केलेले निकष तसेच इमारत बांधकाम आणि भौतिक सुविधांबाबत AICTE निकषांची पूर्तता करणे आवश्यक आहे, आणि

ii) मुंबई महानगर प्रदेशाध्ये 2 हेक्टर जागा, किंवा वरील (i) प्रमाणे बांधकाम क्षेत्र आणि सुविधांसाठी आवश्यक असलेली किमान जागा.

iii) मेट्रो शहरांमध्ये 4 हेक्टर जागा (नागपूर, औरंगाबाद, पुणे, नाशिक)

iv) राज्यातील उर्वरीत भागात 6 हेक्टर जागा

**3) आवश्यक शैक्षणिक मानके:**

अ) नॅक (NAAC) मानांकन, एनबीए गुण:

i) प्रमूख महाविद्यालयास नॅक (NAAC) चे 3.25 मानांकन किंवा समतुल्य एनबीए (NBA) गुण किंवा महाविद्यालयातील एकूण

अभ्यासक्रमांपैकी 60% अभ्यासक्रम NBA मान्यताप्राप्त असणे आवश्यक आहे.

ii) सर्व सहभागी महाविद्यालयांना (प्रमूख महाविद्यालय वगळून) वैध नॅक (NAAC) मानांकन आणि/किंवा प्रत्येक महाविद्यालयात किमान NBA मान्यता असलेले 30% अभ्यासक्रम असणे आवश्यक आहे

आ) संशोधन केंद्र: संलग्न विद्यापीठाने मंजूर केलेली आणि यूजीसीच्या विहित नियमांनुसार असेलली **किमान दोन** कार्यशील संशोधन केंद्रे.

इ) संशोधन क्षमता: प्रमूख आणि सहभागी घटक महाविद्यालयांचे प्रकाशने, संशोधन प्रकल्पहाती घेणे आणि संशोधन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून उत्कृष्ट संशोधन कार्यप्रदर्शन असले पाहिजे.

ई) शैक्षणिक कामगिरी : प्रमूख आणि सहभागी घटक महाविद्यालयांनी आंतरविद्याशाखीय अध्यापन आणि संशोधन कार्यक्रमांमध्ये उच्च शैक्षणिक कामगिरी दाखवली पाहिजे.

उ) संसाधनांचे एकत्रीकरण: प्रस्तावित समूह विद्यापीठ उपलब्ध सार्वजनिक निधी व्यतिरिक्त संसाधने वाढवण्याची/ संकलित करण्याची क्षमता प्रदर्शित करण्यास सक्षम असावे.

**4) इतर आवश्यक निकषः-**

अ) डिजिटल पायाभूत सुविधा: प्रमूख आणि सहभागी घटक महाविद्यालयांमध्ये अध्यापन, शिक्षण व प्रशासन आणि अदययावत नेटवर्किंग सुविधांसाठी बळकट डिजिटल पायाभूत सुविधा असणे आवश्यक आहे.

आ) स्थानिक आणि इतर भारतीय भाषांमध्ये अभ्यासक्रम उपलब्ध करणे: प्रस्तावित समूह विद्यापीठाने स्थानिक प्रादेशिक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि नविन शैक्षणिक धोरण-2020 अंतर्गत सुचविल्याप्रमाणे भाषिक विविधतेला प्रोत्साहन देण्यासाठी मराठी आणि इतर भारतीय भाषांमध्ये काही अभ्यासक्रम उपलब्ध

करण्यासाठी वचनबद्ध असले पाहिजे.

इ) उद्योग सहयोग: प्रस्तावित समूह विद्यापीठाने संशोधन सहयोगासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्था/ उद्योगांसह भागीदारीची सद्यस्थिती सादर केली पाहिजे, तसेच प्रशिक्षणार्थी/ इंटर्नशिप आणि एम्बेडेड पदवी कार्यक्रम प्रदान केले पाहिजेत आणि त्याच्या वाढीसाठी आणि विस्तारासाठी आराखडा सादर केला पाहिजे.

ई) पीएच.डी. स्तरावरील शैक्षणिक अभ्यासक्रम: समूह विद्यापीठाच्या प्रस्तावात पीएच.डी. अभ्यासक्रम, संशोधन कार्य आणि नवकल्पनांचा समावेश असावा.

उ) माहिती तंत्रज्ञान आणि स्टार्ट-अप केंद्रे: प्रस्तावित समूह विद्यापीठासाठी माहिती तंत्रज्ञान केंद्र, स्टार्ट-अप सेंटर, इनोव्हेशन आणि इनक्युबेशन सेंटर आणि या क्षेत्रातील इतर बाबीं अनिवार्य असतील.

ऊ) विद्यापीठ अनुदान आयोग व राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन : नवीन शैक्षणिक धोरणाबाबत विद्यापीठ अनुदान आयोग आणि राज्य शासनाने निर्गमित केलेल्या सूचना व मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करावे.

ए) नवीन श्रेयांक आराखडा : प्रस्तावित समूह विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अनुषंगाने शैक्षणिक व श्रेयांक आराखड्यासंदर्भात शासनाने दिलेल्या निर्देशांचे पालन केले पाहिजे.

ऐ) बळकट प्रशासन संरचना: प्रस्तावित समूह विद्यापीठामध्ये नियामक संस्थांनी निर्दिष्ट केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एक बळकट अंतर्गत प्रशासन संरचना असावी. त्यांनी संबंधित वैधानिक संस्था जसे की व्यवस्थापन मंडळ, शैक्षणिक परिषद, अभ्यास मंडळ, संशोधन परिषद, वित्त समिती आणि इतर समित्या स्थापन केल्या पाहिजेत.

ओ) राज्य शासनाच्या धोरणानुसार आरक्षण: प्रस्तावित समूह विद्यापीठाने राज्य शासनाच्या लागू असलेल्या आरक्षण धोरणाचे काटेकोरपणे पालन करावे.

औ) दिव्यांगांसाठी अनुकूल पायाभूत सुविधा: समूह विद्यापीठामधील महाविद्यालयांच्या

सर्व इमारती दिव्यांग-अनुकूल असायला हव्यात, दिव्यांग व्यक्तींच्या गरजा पूर्ण करण्यासाठी योग्य भौतिक सुविधा पुरवल्या पाहिजेत.

**5) वचनबद्धता:** प्रस्तावित समूह विद्यापीठाने खालील आवश्यकता आणि अपेक्षा विद्यापीठाच्या DPR (Detailed Project Report- सविस्तर प्रकल्प अहवाल) मध्ये योग्यरित्या समाविष्ट करुन त्या पूर्ण करण्यासाठी वचनबद्ध असावेः-

अ) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- 2020 ची अंमलबजावणी: प्रस्तावित समूह विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये नमूद केलेल्या कृती मुद्द्यांची स्पष्ट वेळापत्रकासह अंमलबजावणी करण्यास वचनबद्ध असावे.

आ) सुविधा आणि उपक्रमांची वाटणी: सर्व महाविद्यालयांनी (प्रमूख आणि सहभागी घटक) विद्यमान सुविधा सामायिक करण्यास सहमती दर्शविली पाहिजे आणि प्रवेश, समानता आणि शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी संयुक्त उपक्रम हाती घेतला पाहिजे.

इ) शैक्षणिक, परीक्षा आणि प्रशासन सुधारणा: समूह विद्यापीठाने मार्गदर्शक तत्वांनुसार शैक्षणिक, परीक्षा आणि प्रशासन सुधारणांसाठी वचनबद्ध असले पाहिजे.

ई) समान प्रशासकीय तत्वे: प्रस्तावित समूह विद्यापीठाने सहभागी घटक महाविद्यालयांना समान दर्जा, सामूहिक निर्णय घेणे, स्वायत्तता आणि जबाबदारी, स्वातंत्र्य आणि परस्परावलंबन, संस्थांची भागीदारी आणि सामाजिक उत्तरदायित्व या तत्वांचे पालन केले पाहिजे.

उ) प्रशासन रचना: संबंधित संस्थांनी राज्य आणि केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वांनुसार समूह विद्यापीठांसाठी एक योग्य प्रशासन रचना प्रस्तावित करावी.

ऊ) पायाभूत सुविधा वाढवणे: समूह विद्यापीठाने विद्यमान इमारतींचे दिव्यांगासाठी पूर्णपणे अनुकूल संरचनांमध्ये रूपांतर करण्याची आणि वर्गखोल्या, प्रयोगशाळा आणि ग्रंथालयांसाठी पुरेशी जागा सुनिश्चित करण्याची योजना आखली पाहिजे.

ए) विद्यार्थ्यांसाठी निवास व्यवस्था: समूह विद्यापीठाने सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना योग्य प्राधान्य देऊन पुरेशी वसतिगृहाची सोय किंवा विद्यार्थी-विद्यार्थीनीच्या निवासासाठी योग्य व्यवस्था केली पाहीजे.

ऐ) गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती: समूह विद्यापीठाने गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि आवश्यकतेनुसार इतर आर्थिक मदत देण्याचे वचन दिले पाहिजे.
डीपीआरमध्ये विद्यार्थ्यांची संख्या आणि शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी पात्रता निकष नमूद केले पाहिजेत.

ओ)आयसीटी एकत्रीकरण: शैक्षणिक संस्थेने समूह विद्यापीठामधील सर्व महाविद्यालयांमध्ये अध्यापन, शिक्षण आणि मूल्यमापन प्रक्रियेमध्ये माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान (ICT) समाविष्ट करण्यासाठी वचनबद्ध असले पाहिजे. यामध्ये विद्यार्थ्यांना इंटरनेट सुविधा, लायब्ररीमध्ये डिजीटल डेटाबेस, डिजिटल सामग्रीमध्ये उपलब्ध केली पाहिजे.

औ) कार्य मूल्यांकन प्रणाली: अध्यापन आणि अध्यापनशास्त्रातील गुणवत्ता आणि प्रभाव राखण्यासाठी अध्यापन आणि अध्यापनशास्त्रातील नावीन्यता ओळखण्या साठी सर्वसमावेशक अभिप्राय आणि कार्यप्रदर्शन मूल्यमापन प्रणाली लागू केली पाहिजे.

अं) अध्यापकांना प्रोत्साहन: उत्कृष्च कार्य करणा-या अध्यापकांना योग्य पुरस्कार, पदोन्नती, ओळख आणि नेतृत्व संधींद्वारे प्रोत्साहन दिले पाहिजे.

**6) समूह विद्यापीठासाठी तपशीलवार प्रकल्प अहवाल/ प्रस्ताव (DPR):** तपशीलवार प्रकल्प अहवाल (DPR) मध्ये वरील मुद्यांसह व वचनबद्धतेसह पुढील गोष्टींचा समावेश असणे आवश्यक आहे :

अ) शैक्षणिक संस्थेचा विकास आराखडा: प्रस्तावित समूह विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने पुढील पाच वर्षाच्या कालावधीचा तपशीलवार आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

आ) इतर सार्वजनिक आणि खाजगी विद्यापीठांप्रमाणे विद्यार्थ्यांना राज्यातील सहभागी

महाविद्यालयांमध्ये अभ्यासक्रम आणि श्रेयांकांसह प्रवेश घेणे आणि ते उपलब्ध होणे सुलभ होण्यासाठी डीपीआरमध्ये प्रस्तावित समूह विद्यापीठाच्या महाविद्यालयांद्वारे विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम आणि श्रेयांक प्रणाली उपलब्ध करण्याच्या विस्तृत धोरणांचा समावेश असावा.

इ) पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी. अभ्यासक्रम: डीपीआरमध्ये नाविन्यपूर्ण बहुविद्याशाखीय पदवी, पदव्युत्तर तसेच पीएच.डी.च्या अभ्यासक्रमाची रूपरेषा समाविष्ट करावी. याव्यतिरिक्त, काही कालबद्द ग्रीनफिल्ड शैक्षणिक कार्यक्रमांचा समावेश असावा.

ई) प्रस्तावित समूह विद्यापीठाने डीपीआरमध्ये बहुविद्याशाखीय दृष्टिकोनासह विद्यमान पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांची रुपरेषा/ योजनांचा उल्लेख केला पाहिजे.

उ) प्रस्तावित समूह विद्यापीठाने भविष्यातील विस्तारासाठी अतिरिक्त पायाभूत सुविधा, मनुष्यबळ आणि इतर संसाधनांची आवश्यकता नमूद करावी. डीपीआरमध्ये प्रस्तावित समूह विद्यापीठासाठी आवश्यक असलेल्या आर्थिक संसाधनांच्या एकत्रिकरणासाठीच्या तरतुदींचा स्पष्ट उल्लेख असलेल्या पाच वर्षांच्या आर्थिक अंदाजांचाही समावेश असावा.

**क) समूह विद्यापीठाच्या निर्मितीची प्रक्रिया:**

i) शैक्षणिक संस्था/ व्यवस्थापनांना आमंत्रण: या मार्गदर्शक तत्वांना अंतिम रूप दिल्यानंतर, शासन, सार्वजनिक सूचनेद्वारे, महाविद्यालये/ HEI च्या इच्छुक व्यवस्थापनांना समूह विद्यापीठांमध्ये रूपांतर करण्यासाठी अर्ज करण्यासाठी आमंत्रित करेल.

ii) तपशीलवार प्रकल्प अहवाल: स्वारस्य असलेले शैक्षणिक संस्था/ व्यवस्थापन या मार्गदर्शक तत्वांमध्ये आवश्यक असलेल्या सर्व तपशीलांचा समावेश असलेला तपशीलवार प्रकल्प अहवाल सादर करतील.

iii) प्रस्तावाची छाननी: प्राप्त झालेल्या डीपीआरची छाननी करण्यासाठी राज्यशासनाद्वारे एक समिती नियुक्त केली जाईल. छाननीमध्ये आवश्यकतेनुसार सहभागी महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेटींचा समावेश असू शकेल.

iv) शिफारस आणि मान्यता: समिती आवश्यक तपशील आणि स्पष्टीकरण मिळविण्यासाठी प्रश्न उपस्थित करू शकेल आणि त्यानंतर प्रस्तावांबद्दल आपल्या शिफारसी शासनास सादर करेल.

v)मंत्रिमंडळ आणि माननीय राज्यपाल यांची मान्यता: पात्र प्रस्तावांवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 च्या कलम 3(6) च्या तरतुदींनुसार प्रक्रिया केली जाईल.

**ड) समूह विद्यापीठाचे विघटन**

i) विद्यापीठाचे नियामक मंडळ, विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांना आणि विद्यापीठातील विद्यार्थ्यांना आणि शासनाला किमान एक वर्ष अगोदर पुरेशा कारणांसह नोटीस देऊन विद्यापीठ विसर्जित करू शकते.

ii) विद्यमान विद्यापीठाने कायद्यातील कोणत्याही तरतुदींचे किंवा तेथे केलेल्या नियमांचे, कायद्याचे किंवा अध्यादेशांचे उल्लंघन केले आहे, किंवा अधिनियम किंवा अधिसूचनेद्वारे जारी केलेल्या कोणत्याही निर्देशांचे उल्लंघन केले आहे, असे राज्यशासनाला दिसून आल्यास, किंवा प्रस्तावित विद्यापीठात कोणतेही उपक्रम राबविणे बंद केलेअसल्यास, प्रस्तावित विद्यापीठात आर्थिक गैरव्यवस्थापन किंवा गैर-प्रशासनाची परिस्थिती उद्भवली असेल, तर ते प्रस्तावित विद्यापीठाला पंचेचाळीस दिवसांच्या आत कारणे दाखविण्याची नोटीस जारी करू शकते.

iii) विसर्जनाच्या बाबतीत, राज्यशासन, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसह इतर कोणाच्याही आर्थिक, गैर-आर्थिक आणि शैक्षणिक स्वरूपाच्या थकित दायित्वांचे तसेच अनुपालन न केल्यास शैक्षणिक संस्था नुकसान भरपाई देण्यास वचनबद्ध असल्यास शैक्षणिक संस्थेकडून अशी नुकसान भरपाई वसूल करण्याच्या अनुषंगाने मुल्यांकन आणि पडताळणी करेल.अशा मूल्यांकन आणि निश्चितीच्या प्रक्रियेत शैक्षणिक संस्थेला प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार असेल.

iv) नियमित अभ्यासक्रमांच्या शेवटच्या तुकडीच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर आणि त्यांना पदविका, पदवी किंवा पुरस्कार प्रदान केल्यानंतरच विद्यापीठाचे विसर्जन लागू होईल.

v) विसर्जनानंतर, समूह विद्यापीठाचे प्रमूख महाविद्यालय आणि सहभागी घटक महाविद्यालये राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने मूळ विद्यापीठाशी संलग्न होऊ शकतात.

****************